महावितरण
महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्या.
(महाराष्ट्र शासन अंगीकृत)
CIN : U40109MH2005SGC153645
दुरध्वनी क्रमांक : ०२२ - २४०७७४४१
फॅक्स क्रमांक : ०२२ - २४०२५७६३

क्र.मासं/रवका/न.क्र.६६४/२००८२
एक्स्ट्रेला बॅटरीज विस्तारीत इमारत,
तळ मजला, प्लॉट नं.१,धारावी रोड,माटुंगा,
मुंबई ४०० - ०१९
email : cgmp@mahadiscom.in
website : www.mahadiscom.in
दिनांक : १७.०४.२०१५

# परिपत्रक

विषय : नक्षलग्रस्त भागात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना देण्यात येत असलेल्या सोई-सवलतींबाबत.

संदर्भ : १) सा.आ. क्र.१२० (क), दि.०१.०७.१९८९.
२) प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.०१.२००३.
३) प्रशासकीय परिपत्रक क्र.५०३ दि.२६.०३.२०१५
४) शासन निर्णय क्र.०९१२/प्र.क्र.३६९/वि.शा.१-ब, दि.२६.१२.२०१४.

......

सामान्य आदेश क्र.१२० (क) दि.०१.०७.१९८९ मधील तरतुदींनुसार प्रशासकीय परिपत्रक क्र.३७८ दि.२९.०१.२००३ अन्वये शासन निर्णय क्र.टिआरएफ-२०००/प्र.क्र.३/बारा दि.०६.०८.२००३ च्या धर्तीवर नक्षलग्रस्त/ आदिवासी भागात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना विविध सोई-सवलती लागू करण्यात आलेल्या आहेत. तसेच शासनाने वेळोवेळी या संदर्भात जाहीर केलेल्या धोरणानुसार त्यात वाढ/बदल/सुधारणा करण्यात आलेल्या आहेत.

२. या अनुषंगाने गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांनी पारित केलेल्या शासन निर्णय क्र.एनएएक्स ०९१२/प्र.क्र.३६९/ वि.शा.१-ब दि.२६.१२.२०१४ अनुसार नक्षलग्रस्त म्हणून घोषित केलेल्या जिल्हयाच्या/ तालुक्याच्या/गावाच्या ठिकाणी कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना पुर्वी पुरविण्यात आलेल्या सोई-सवलती यापुढेही चालू ठेवण्याबाबत व सदर शासन निर्णयामध्ये वगळण्यात आलेल्या इतर जिल्हयाच्या/तालुक्याच्या/ गावाच्या ठिकाणी कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांच्या सदर सोई-सवलती बंद करण्याबाबतचे आदेश प्रशासकीय परिपत्रक क्र.५०३ दि.२६.०३.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आले होते.

३. आता गृह विभाग, महाराष्ट्र शासन यांचा शासन निर्णय क्र.एनएएक्स ०९१२/प्र.क्र.३६९/वि.शा.१-ब दि.१८.०२.२०१५ अन्वये उपरोल्लेखित शासन निर्णय दि.२६.१२.२०१४ स्थगित करण्यात आलेला आहे. याच धर्तीवर सक्षम अधिकारी यांनी प्रशासकीय परिपत्रक क्र.५०३ दि.२६.०३.२०१५ अन्वये निर्गमित करण्यात आलेले आदेश स्थगित करण्याबाबत मंजुरी प्रदान केलेली आहे. या अनुषंगाने सर्व संबंधीतांनी नक्षलग्रस्त भागात कार्यरत अधिकारी/कर्मचारी यांना पुरविण्यात आलेल्या सोई-सवलतींबाबत शासनाच्या धर्तीवर पुढील आदेश निर्गमित होईपर्यंत या संदर्भात प्रचलित तरतुदींनुसार कार्यवाही करावी.

४. सदर परिपत्रक कंपनीच्या R-APDRP Portal वर उपलब्ध करण्यात आले आहे.

(संदेश ए. हाके)
मुख्य महाव्यवस्थापक (मासं)

D:\O&MAdm.Cir.F.N.664.doc

Scanned by CamScanner